दिवाणी किरकोळ अर्ज क्र.७१९/२०२२
अन्नपुर्णा व इतर वि. कोंडाबाई व इतर
अर्जदारातर्फे सा.क्र.२
(नि.क्र.५८)

**<u>उलटतपास गैरअर्जदार क्र. १ व २ तर्फे श्री.एस.व्ही.देशमुख वकील यांच्यामार्फत सुरु.</u>**

**४.** हे खरे की, दत्तात्रयच्या पहिल्या पत्नीचे नाव कोंडाबाई आहे. हे खरे की, अर्जदार आणि माधव ही त्यांची दोन मुले आहेत. हे खरे की, कोंडाबाई जिवंत असताना दत्तात्रयने हरिबाई आणि विजयाबाई यांच्यासोबत लग्न केले.

**गैरअर्जदार क्र. १ व २ तर्फे उलटतपास पुर्ण.**
**गैरअर्जदार क्र.३ च्या उलटतपासासाठी तहकूब.**

**श्रवणोत्तर स्विकृत**
समक्ष
स्वाक्षरीत/-
( एस.एन.सरडे )

दिनांक २४/०९/२०२४. दिवाणी न्यायाधीश व. स्तर, अहमदपूर.

**<u>उलटतपास गैरअर्जदार क्र.३ तर्फे श्री.डी.एल.घोगरे वकील यांच्यामार्फत सुरु.</u>**

**५.** मी शिक्षीत आहे. महेबुबसाहेब म्हणुन एक खाजगी शिक्षक गावातील मुलांना शिकवायला यायचे. त्यांच्या हाताखाली मी शिकलो आहे. माझे वय मी कशाच्याआधारे सांगितले किंवा त्याचा कागदोपत्री पुरावा आहे का यास माझे सांगणे माझयाकडे कागदोपत्री पुरावा नाही. माझया आधारकार्डावर जन्म साल १९४० असे आहे. ते सुध्दा अंदाजानेच सांगितले आहे. माझया आईने माझया आधारकार्डावरची माहिती दिली. आईच्या सांगण्यावरुन मी सुध्दा ही माहिती दिली. माझया आईची मृत्यु तारीख मला आठवत नाही. कोंडाबाई यांना माधव आणि अन्नपुर्णा अशी दोन अपत्ये होती. हरीबाईला केशव हा मुलगा होता. कोंडाबाई आणि दत्तात्रयचे लग्न कोणत्या वर्षी झाले हे मला सांगता येणार नाही. त्यांचे लग्न झाले त्यावेळी मी १४-१५ वर्षाचा होतो. त्यांचे लग्न शेलदरा गावी झाले. हरिबाईचे लग्न सय्यदपूरमध्ये झाले. हरिबाई व दत्तात्रयच्या लग्नाला मी हजर होतो.

हरिबाई व दत्तात्रय यांच्या लग्नात सप्तपदी, मंगलाष्टका असे विधी झाले नाहीत. हरिबाई व दत्तात्रयच्या लग्नाला २०-२५ लोक हजर होते. त्यावेळी माझे वय १५ वर्षाचे होते. अन्नपुर्णाचा जन्म १९५६ साली झाला. अन्नपुर्णाचे शिक्षण झालेले नाही. अन्नपुर्णाला टोपणनाव आहे हे मला माहिती नाही. तिचे मुळ नाव गिरीजा आहे याबद्दल मला माहिती नाही. शेलदरा येथे जि.प.प्रा.शाळा आहे हे म्हणणे खरे आहे. अन्नपुर्णाचे शिक्षण या शाळेत झाल्याचे मला माहिती नाही. त्या शाळेत तिच्या जन्माचे रेकॉर्ड असल्याचे मला माहिती नाही. ०३/०२/१९६१ अशी तिची शाळेतील जन्मतारीख आहे यास माझे सांगणे की, ती १९५६ साली जन्मली. अन्नपुर्णाच्या वडीलांनी तिचा जन्म १९५६ सालातील आहे असे मला सांगितल्याने मी तसे सांगतो. त्यांनी ही घटना कधी सांगितली हे माझया लक्षात नाही. आता मला **नि.क्र.५१** दाखविला. तो बरोबर असावा. हे खरे नाही की, तिचा जन्म १९५६ सालातील आहे असे मी खोटे सांगतो. केशव हा अन्नपुर्णाच्यानंतर जन्माला आला. त्याचा जन्म अन्नपुर्णाच्यानंतर २-३ वर्षानी झाला. त्याचा जन्म अन्नपुर्णाच्यानंतर झाला असे मी स्वत: पाहिल्यामुळे सांगतो. त्यांचे घर माझया शेजारी असल्यामुळे मला त्याची माहिती आहे. माझे घर व दत्तात्रयचे घर शेजारी-शेजारी नाही. केशवचे शिक्षण जि.प.प्रा.शाळा, शेलदरा येथे झाले याबद्दल माझे सांगणे की, तसे ते झाले असावे. ०५/०८/१९६० अशी केशवची जन्मतारीख या शाळेच्या दाखल्यामध्ये असावी. आात मला **नि.क्र.५०** हा दाखला दाखविला. तो त्याचाच असावा.

**६.** केशवला दोन मुली व एक मुलगा आहे. मुलींचे वय २०-२२ वर्षे असावे व मुलगा त्यांच्यापेक्षा लहान आहे. अन्नपुर्णा तिच्या दिलेल्या घरी म्हणजे रामतीर्थ, ता.कंधार, जि.नांदेड येथे राहते. अन्नपुर्णाला तीन मुलगे आणि दोन मुली अशी अपत्ये आहेत. त्यांची नावे मला सांगता येत नाहीत. मी त्यांच्या वयाचे दाखले बघितलेले नाहीत. केशवच्या अपत्यांपेक्षा अन्नपुर्णाची अपत्ये वयाने मोठी आहेत

असे मी माझया वैयक्तिक ज्ञानातुन सांगितले. अन्नपुर्णा हिला शेलदरा आणि रामतीर्थ या ठिकाणी ही मुले झाली. केशवच्या मुलांचे जन्म हंगरगा येथे झाले. अन्नपुर्णाची मुले केशवच्या मुलांपेक्षा वयाने मोठी आहेत असे मी अंदाजपंचे सांगतो हे खरे नाही.

**७.** कोंडाबाई हिप्परगा येथील आहे. हरीबाई सय्यदपूर येथील आहे. हे खरे की, हरिबाईचा मुलगा केशव हा दत्तात्रयपासुन जन्मला. हे खरे की, दत्तात्रय याला दत्ता असेही म्हणत. हरीबाई दत्तात्रयची पहिली पत्नी आहे हे खरे नाही. १९५४ साली दत्तात्रय आणि हरिबाई यांचा विवाह हिदु धर्म शास्त्राप्रमाणे संपन्न झाला याबद्दल मला माहिती नाही. हे खरे नाही की, दिनांक ०८/०५/१९६० रोजी पहिले अपत्य केशव जन्माला आले. हे खरे नाही की, पहिली पत्नी हयात असताना दत्तात्रयने कोंडाबाईसोबत १९५९ साली बेकायदेशीर दुसरा विवाह केला. हे खरे की, १९६४ साली दत्तात्रयने विजयाबाईशी तिसरा बेकायदेशीर विवाह केला. हे खरे की, विजयाबाई हिला दत्तात्रयपासुन कोणतेही अपत्य झाले नाही. हरिबाई सन २०१६ मध्ये मयत झाली व विजयाबाई ही २०२० सालामध्ये मयत झाली हे म्हणणे खरे आहे. सन २००३ मध्ये दत्तात्रय मयत झाले याबद्दल मला निश्चीत सांगता येत नाही. मात्र दत्तात्रय या दोघींच्याअगोदर मयत झाला हे खरे आहे. हे खरे नाही की, दत्तात्रय, हरिबाई आणि विजयाबाई यांचा एकमेव कायदेशीर वारस केशव आहे. अर्जदार आणि गैरअर्जदार क्र.१ व २ हे मयत दत्तात्रय यांचे कायदेशीर वारस नाही हे म्हणणे खरे नाही. कोंडाबाई ही हरिबाईच्या हयातीत तिच्याशी लग्न केल्याने बेकायदेशीर पत्नी आहे व प्रतिवादी क्र.१ व २ ही अनौरस अपत्य आहेत हे म्हणणे खरे नाही. मी मतदान करतो. मला मतदार यादी ओळखता येते. आता मला मतदार यादी **नि.क्र.६२** दाखविली. हरिबाई, कोंडाबाई आणि विजयालक्ष्मी यांची नावे मतदार यादीत पान क्र.३२६ वर आहेत. मतदार यादीतील नोंदी बरोबर घेतल्या असतील.

८. विजयाबाईच्या नावे १६-१७ एकर जमीन होती. विजयाबाईच्या नावची जमीन केशवच्या ताब्यात आहे हे खरे नाही. मी सांगतो की, ती माधव दत्तात्रय आणि केशव दत्तात्रय यांच्या ताब्यात आहे. दत्तात्रयच्या नावेसुध्दा जमीन आहे. ती जमीनसुध्दा केशवच्या ताब्यात आहे यास माझे सांगणे की, ती दोन भावांच्या ताब्यात आहे. माधव गावात राहत नाही यास माझे सांगणे की, नौकरीनिमीत्ताने तो अहमदपूर येथे राहतो. महाराष्ट्रात ग्रामपंचायती कधी स्थापन झाल्या हे मला माहिती नाही. अन्नपुर्णाच्या जन्माच्यावेळी महाराष्ट्रात ग्रामपंचायती होत्या किंवा कसे हे माझया लक्षात नाही. ग्रामपंचायतीची पहिली निवडणुक आमच्या गावात कधी झाली हे मला माहिती नाही. हे खरे नाही की, कोंडाबाई ही पहिली पत्नी असल्याचे मी खोटे सांगतो. कोंडबाईची मुले ही पहिली अपत्ये आहेत असे मी खोटे सांगतो हे खरे नाही. हे खरे की, माझे न्यायालयात दावे, खटले आहेत. हे खरे की, मलाही त्या दाव्यात, खटल्यात साक्षीदारांची गरज आहे. हे खरे नाही की, त्या दाव्यांमध्ये मला यातील अर्जदारांच्या साक्षीची गरज आहे म्हणुन त्यांच्या सांगण्यावरुन मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे. हे खरे नाही की, केशवचे आणि माझे वाद आहेत. हे खरे नाही की, माझया सरतपासातील मजकूर खोटा आहे.

**गैरअर्जदार क्र.३ तर्फे उलटतपास पुर्ण.** **श्रवणोत्तर स्विकृत**
**फेरतपास नाही.** समक्ष

स्वाक्षरीत/-

( एस.एन.सरडे )

**दिनांक २१/०४/२०२५.** **दिवाणी न्यायाधीश व. स्तर, अहमदपूर.**